**मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक पदी श्री रणजीत सिंह देओल रुजू**

**मुंबई, २३ जानेवारी २०२०**:- मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा पदभार आज श्री. रणजीत सिंह देओल यांनी स्वीकारला. १९९८ चे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी श्री. देओल आता सर्वात आव्हानात्मक कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो मार्ग ३ चे नेतृत्व करतील.

श्री.रणजीत सिंह देओल यांनी श्रीमती अश्विनी भिडे यांच्या कडून पदभार स्वीकारला. यावेळी दोघांनी एकमेकांना नवीन कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

मेट्रो-३ सारख्या आव्हानात्मक प्रकल्पाच्या दृष्टीने श्री. देओल यांची नियुक्ती महत्त्वाची समजली जाते. मेट्रो ३ द्वारे उपनगरीय रेल्वे द्वारे जोडले न गेलेले महत्त्वाचे भाग तर जोडले जाणारच आहेत शिवाय उपनगरीय रेल्वेवरील ताण कमी होऊन रोज रेल्वे अपघात मध्ये जाणारे हकनाक जीव देखील वाचणार आहेत.

वेगवेगळ्या पदावर काम केल्याचा २० वर्षांहून अधिक अनुभव श्री. देओल यांच्याकडे आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व उपाध्यक्ष असताना अपघात टाळण्यासाठी त्यांनी बस बाढणी साठी हलक्या स्टीलचा वापर करण्याची संकल्पना त्यांनी दिली होती. त्यांच्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कारकिर्दी दरम्यान व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टम व प्रवासी माहिती यंत्रणा कार्यान्वित झाल्या. शिवशाही बसेस, स्मार्ट कार्ड्स, ई- टिकेटींग तसेच संवेदनशील बस स्थानकांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात त्यांनी पुढाकार घेतला.

श्री देओल यांचे वेगवेगळ्या पदावर काम

श्री. रणजीत सिंह देओल यांनी इलेक्ट्रॉनिक अभियांत्रिकीची पदवी संपादन केली असून मॅक्सवेल स्कूल ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, न्युयॉर्क येथून एक्झिक्युटिव्ह मास्टर्स इन पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन ही पदवी संपादन केली आहे.

त्यांनी विविध महत्त्वाच्या पदांवर कामे केली आहेत त्यात सोलापूर महानगर पालिकेचे आयुक्त, संचालक (सेन्सॉर ऑपरेशन), रजिस्ट्रार जनरल (जनसंख्या विभाग, भारत), संचालक, समाज कल्याण विभाग, पुणे यांचा समावेश आहे.

For further media queries please contact

Rajesh Konduparti
+91 8469834515
Rajesh.konduparti@perceptindia.in

Avik nag
+91 8961548164
Avik.nag@perceptindia.in